(३) १

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०१९-२०/१५४

दिनांक २५/६/२०१९

व्यवस्थापन परिषदेची दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

**कार्यवाही अहवालाची सहपत्रे स्कॅन करुन ई-मेल वर पाठविण्यात आली आहेत.**

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही |
|---|---|
| बाब १. | **दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**<br><br>मा. कुलसचिव श्री सुनील भिरूड यांनी दि. ६ ऑक्टोंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्ताचे वाचन केले :-<br>सभेत चर्चा झाल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला. |
| ठराव | मा. कुलसचिव श्री सुनील भिरूड यांनी दि. ६ ऑक्टोंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्ताचे वाचन केले :-<br>सभेत चर्चा झाल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.<br><br>बाब क्र. १ नुसार ठराव करण्यात आला की, दि. ६ ऑक्टोंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मान्य करण्यात आले.<br><br>१) पान क्र. १ मध्ये डॉ. महादाप्पा गं. गोंडा यांच्या नावाचा समावेश उपस्थिती मध्ये करण्यात यावा.<br><br>२) पान क्र. २ मध्ये अभिनंदन या शिर्षकाखालील असलेला<br><br>"महाराष्ट्र सरकारने मुंबई विद्यापीठाची इनक्युबेशन व इनोवेशन सेंटर स्थापन करण्यासाठी निवड करून ५ कोटींचा निधी विद्यापीठास दिल्याबद्दल त्याचे सर्व श्रेय प्र-कुलगुरू व त्यांच्या सहकार्यांना जात असल्याने कुलगुरूंनी त्यांचे अभिनंदन केले."<br><br>**च्या ऐवजी खालील परिच्छेद वाचावा.**<br><br>**"महाराष्ट्र सरकारने मुंबई विद्यापीठाची इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटर स्थापन करण्यासाठी निवड करून ५ कोटींचा निधी विद्यापीठास देण्यासाठी इरादापत्र दिले. त्या निर्णयाचे सर्वांनी स्वागत केले. त्याचे सर्व श्रेय प्र-कुलगुरू व त्यांच्या सहकार्यांना जात असल्याने कुलगुरूंनी त्यांचे अभिनंदन केले."**<br><br>३) पान क्र. १२ बाब क्र. १० 'Increse' च्या ऐवजी 'Increase' वाचावे.<br><br>४) पान.क्र. ११, बाब क्र. ०७ मधील ठरावामध्ये "रू. ३,००,०००/- (रूपये तीन लाख)" च्या ऐवजी "रू. ५,००,०००/- (रूपये पाच लाख)" असे वाचावे.<br><br>५) पान क्र. १२ बाब क्र.११ 'Hotel' च्या ऐवजी 'Hostel' वाचावे. |



30

| | |
|---|---|
| | ६) पान क्र. १५, बाब क्र. १८, ओळ क्र. ५ "केंद्रासाठी ५ कोटी रू. प्राप्त झाल्याची नोंद घेण्यात आली व प्र-कुलगुरूचे आभार व्यक्त करण्यात आले."<br><br>**च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे**<br><br>**"केंद्रासाठी ५ कोटी रू. प्राप्त होणार असल्याची नोंद घेण्यात आली व प्र-कुलगुरूचे अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले."**<br><br>७) पान क्र. १६ बाब क्र. २० मधील ओळ क्र. ९ मध्ये डॉ. गौतम गवळी यांचे नाव वगळण्यात यावे.<br><br>८) पान क्र. १७ मधील बाब क्र. २० मधील "तसेच वसुली झाल्यानंतर सेवा निवृत्ती वेतनाची प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात यावी. डॉ. जोस जॉर्ज यांनी विद्यापीठात निवृत्तीनंतर केलेली सेवा विचारात घेता त्यांना त्याची विद्यापीठाच्या नियमानुसार योग्य ती भरपाई देण्यात यावी."<br><br>**च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे**<br><br>सेवा निवृत्ती वेतनाची प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात यावी तसेच वसुल करावयाची रक्कम वळती करून त्यांना उरलेली रककम अदा करण्यात यावी.<br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, डॉ. जोस जॉर्ज यांनी विद्यापीठात निवृत्तीनंतर केलेली सेवा विचारात घेता त्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार योग्य ती भरपाई देण्याबाबत स्वतंत्र बाब व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवावी. |
| **कार्यकारी प्राधिकरणे विभागाने केलेली कार्यवाही** | पत्र क्रमांक का.प्रा.वि./आय.सी.डी./२०१८-१९/६७२ दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी व्यवस्थापन परिषदेचे ठराव संबधीत विभागास पाठविण्यात आले. |
| **बाब: २** | **दिनांक ९ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल सादर.** |
| **ठराव** | बाब क्र. २ नुसार असा ठराव करण्यात आला की, दिनांक ९ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवालाची सभेकडून नोंद घेण्यात आली. |
| **कार्यकारी प्राधिकरणे विभागाने केलेली** | अहवालाची नोंद घेण्यात आली. |



31

| | |
|---|---|
| कार्यवाही | |
| **बाब: ३** | **दिनांक १४ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल सादर.** |
| **ठराव** | बाब क्र. ३ नुसार असा ठराव करण्यात आला की, दिनांक १४ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवालाची सभेकडून नोंद घेण्यात आली. |
| **कार्यकारी प्राधिकरणे विभागाने केलेली कार्यवाही** | अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| **बाब: ४** | **वित्त व लेखा समितीच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** |
| **ठराव** | वित्त व लेखा समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ चे इतिवृत्त विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी डॉ. संजय शाह यांनी सभेसमोर सादर केले. त्यावर चर्चा झाल्यानंतर बाब क्र. ४ नुसार असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले. |
| **वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही** | वित्त व लेखा विभाग यांनी पत्र क्र.विवले/भाग७/६/विवलेसमिती/१९७ दिनांक २२ जानेवारी, २०१९, क्र.विवले/भाग७/६/विवलेसमिती/१९८, १९९ आणि २०० दिनांक २३ जानेवारी, २०१९ नुसार संबधीत विभागांना पत्र पाठविले आहे. |
| **बाब: ५** | **शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन) सुरू करण्याकरिता इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक संस्थांकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व शासन निर्णय क्र. एनजीसी/२०१७/(२९/१७)/मशि-४ दिनांक १५ सप्टेबर, २०१७ मधील निकषांनुसार प्राप्त झालेले प्रस्ताव.** |
| **ठराव** | बाब क्र. ५ नुसार असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, शासन निर्णय क्र. एनजीसी/२०१७/(२९/१७) मशि-४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ व मुंबई विद्यापीठाची जाहिरात दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, ललीत कला,कौशल्य विकास अभ्यासक्रम) सुरू करण्याकरिता इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक संस्थाकडून ६८ प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर छाननी समितीचा अहवाल व त्रुटीपुर्ततेचा अहवाल अधिष्ठाता मंडळाचा अहवाल व कुलगुरूंचे अभिप्राय व्यवस्थापन मंडळाने तपासून एकूण ६८ प्रस्तावांपैकी ४१ प्रस्ताव पात्र व १९ प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले व पात्र प्रस्ताव व शासन निर्णय दि. १५ सप्टेंबर, २०१७ मधील नमूद केलेल्या २.३(क) नुसार ८ स्वतंत्र प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. सोबत यादी जोडली आहे. (परिशिष्ट'ड') |

| | |
|---|---|
| | विद्यापीठात मागील दोन वर्षाच्या परीक्षांच्या बाबतीत विचार केल्यावर विधी शाखेचे निकाल उत्तर पत्रिका उशिरा तपासल्यामुळे निकाल उशिरा लागतात, असे श्री. मुकादम यांनी निदर्शनास आणले. चर्चेअंती असेही ठरले की, विधी महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून सर्व उत्तर पत्रिकांची तपासणी महाविद्यालयांच्या शिक्षकांकडून केली जाईल, असे शपथपत्र लिहून घ्यावे व नंतरच नवीन विधी महाविद्यालय सुरू करण्यास संलग्नता देण्यात यावी, असे ठरले. |
| संलग्नता व मान्यता विभागाने केलेली कार्यवाही | पत्र क्र.संलग्नता/आयसीडी/२०१८-१९/१७१९, १७२०, १७२१, १७२२ दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ आणि क्र. संलग्नता/आयसीडी/२०१८-१९/२५४० दिनांक २६ मार्च, २०१९ नुसार कार्यवाही झाल्याचे कळविले आहे. |
| **बाब: ६** | **सार्वजनिक अकृषी विद्यापीठे व महाविद्यालये यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांकन वाढविण्याच्या कामात सल्ला व सेवा देण्याकरिता Indian Center for Academic Ranking and Excellence या संस्थेच्या नियुक्तीबाबत शासन निर्णय दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१८ स्वीकारण्याबाबत प्रस्ताव.** |
| ठराव | बाब क्र. ६ नुसार I Care सोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य कराराबाबत खालील मुद्यांवर चर्चा करण्यात आली :-<br>१) खर्चामुळे विद्यापीठावर येणारा आर्थिक भार<br>२) शासन शिक्षक संख्या वाढवून देत नाही.<br>३) करारामध्ये पाच वर्षाचा रोड मॅप नाही.<br>४) समाप्ती कलम (Termination Clause) मध्ये शासनाकडे सर्व हक्क दिलेले आहे.<br><br>अनेक सदस्यांनी शंका आणि प्रश्नांच्या अनुषंगाने प्रस्तावास एकमताने विरोध दर्शविला तसेच सविस्तर चर्चेअंती असे लक्षात आले की, या विषयाचे योग्य प्रकारे आणि सविस्तर सादरीकरण झालेले नाही.<br>कुलगुरूंनी सभागृहाला विंनती केली की, याबाबत सर्व पार्श्वभूमी मांडणे गरजेचे आहे व त्यासंबंधात व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत प्र-कुलगुरू यांनी सविस्तर माहितीसह विषयाची मांडणी करून पुन्हा सविस्तर माहितीसह सादरीकरण करण्यात यावे गरज भासली तर I-Care च्या प्रतिनिधींना बोलावून व्यवस्थापन परिषदेत अथवा अन्य बैठक बोलवून याबाबत सविसतर माहिती त्यांच्याकडून देण्यात येईल. |
| विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागाने केलेली कार्यवाही | या सदंर्भात महाराष्ट्र सरकारने तुर्तास स्थगिती दिली आहे. |
| **बाब: १४** | **विद्यापीठातील विविध संस्था व विभाग येथे संचालक/प्राध्यापक आणि संचालक/प्राध्यापक-नि-संचालक/सहयोगी प्राध्यापक आणि उपसंचालक (वाणिज्य) पदांच्या नियुक्तीबाबत** |
| ठराव | बाब क्र. १४ नुसार असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठातील |



33

विविध विनाअनुदानित व स्वयंअर्थसाहय्यित (self finance) परिसंस्था व विभाग येथील पदांचे नामाभिदान (nomenclature) बदलून प्राध्यापक आणि संचालक व सहयोगी प्राध्यापक-नि-उपसंचालक ऐवजी 'संचालक' व 'उपसंचालक' अनुक्रमे असे बदल करण्यास मान्यता देण्यात आली.

असाही ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठातील खालील विनाअनुदानित व स्वयंअर्थसाहय्यित (self finance) परिसंस्था व विभाग येथील 'संचालक' व 'उपसंचालक' ही पदे भरती प्रक्रियेने (फक्त पाच वर्षाच्या कालावधीकरिता किंवा वय वर्ष ६० पूर्ण होईपर्यंत जे काही आधी असेल) त्याप्रमाणे भरण्यासाठी मान्यता देण्यात आली. परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे विविध पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव व सेवानिवृत्ती वय यास मान्यता देण्यात आली.

| Sr. No. | Designation of the post | Department/Centre/Institute | No. of posts |
|---|---|---|---|
| 1 | Director | Academy of Theatre Arts | 1- Open |
| 2 | Director | Garware Institute of Career Education and Development (GICED) | 1- Open |
| 3 | Director | Institute of Distance Open Learning (IDOL) | 1- Open |
| 4 | Deputy Director | Institute of Distance Open Learning (IDOL) | 1- Open |

**शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि) यांनी केलेली कार्यवाही**

सदर ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठातील विविध विनाअनुदानित व स्वयंअर्थसाहय्यित (self finance) परिसंस्था व विभाग येथील पदांचे नामाभिदान (nomenclature) बदलून प्राध्यापक आणि संचालक व सहयोगी प्राध्यापक-नि-उपसंचालक ऐवजी 'संचालक' व 'उपसंचालक' अनुक्रमे असे बदल करण्यात आले. तसेच ठरावानुसार संचालक व उपसंचालक पदांच्या अर्हता, अनुभव व सेवाशर्ती या बाबतही दुरुस्ती करुन दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी मुलाखती संपन्न झाल्या असुन श्री. योगेश सोमण यांची संचालक Academy of Theatre Art येथे ५ वर्षाच्या कालावधिकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. सोमण यांनी दिनांक १६/३/२०१९ रोजी (मध्यांनतर) संचालक पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

**बाब: १५**

**विद्यापीठातील विविध विभाग व परिसंस्था येथे चेअर प्रोफेसर पदाच्या नियुक्तीबाबत**

**ठराव**

बाब क्र. १४ नुसार असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठातील विविध विभाग व परिसंस्था येथे खालील नमूद केल्याप्रमाणे चेअर प्रोफेसर पद भरती करण्यास मान्यता देण्यात आली. परिशिष्ट 'ब' मध्ये नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व सेवानिवृत्ती वय यास मान्यता देण्यात आली.

| Sr. No. | Name of the Endowment Chair Professor's/Reader's | Department | No. of post |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Dr. D. T. Lakdawala Chair in Growth and Development (Planning commission Professor of Planning & Development) | Economics | 1- Open |
| 2 | Professor in Urban Economic and Regional Development Under Dr. Vibhooti Shukla Memorial Endowment. | -----do---- | 1- Open |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar Chair in Political Economics (RBI) | ----do---- | 1- Open |
| 4 | Rajiv Gandhi Chair on contemporary Studies | Rajiv Gandhi Centre for contemporary Studies | 1- Open |
| 5 | Guru Gobind Singh Chair | History | 1- Open |

तसेच सदर ठरावांच्या अनुषंगाने विद्यापीठात असलेल्या Endowment Chair ची माहिती व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी.

| | |
|---|---|
| शि. नि. व मा. विभाग (वि.शि.) विभागाने केलेली कार्यवाही | चेअर प्रोफेसर पदभरती प्रक्रीये/जाहिरातीमध्ये शैक्षणिक अर्हता, अनुभव व सेवा निवृत्तीचे वय इत्यादीमध्ये ठरावा नुसार बदल करण्यात आले आहेत.<br><br>सदर ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठातील विविध विभाग व परिसंस्था येथे प्रोफेसर/चेअर प्रोफेसर पदाच्या नियुक्ती बाबत शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागांमार्फत दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी विद्यापीठाच्या http://mu.ac.in/portal/careers आणि https://muonline.org.in/recruitment या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर पदाकरीता अर्ज प्राप्त झाले आहेत. विद्यापीठात असलेल्या Endowment Chair ची माहिती सोबत जोडली आहे. |
| बाब: १७ | **Ordinance on the Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment of Women and Prevention of Gender Discrimination.** |
| ठराव | It was resolved that the Ordinance on Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of Women Employees and Student be approved considering corrections and modifications suggested by the Adv. Neel Helekar committee and the same may be sent to Chancellor for his assent. |
| महिला विकास कक्षाने केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक WDC/107 of 2019 Dated 27th March, 2019<br>Further, we woul wish to bring to your notice the following:<br>➢ Ordinance was placed before the Management Council on 06-10-2018.<br>➢ We sent a reminder, Ref.No.WDC/212 of 2018, dt.05-12-2018<br>➢ We received communication on 04-12-2018 from EAU stating MC resolution:<br>' It was resolved that a committee consisting of Adv. Shri. Neel Helekar (Comvener), DR. Rashmi Oza and Shri Pradeep Sawant be constituted to finalize the Ordinance.<br>It was also resolved that the Ordinance on Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of women Employees and student be apporoved subject to corrections and modifications suggested by the Helekar committee and the same may be placed before the Management Council |



35

| | |
|---|---|
| | for information and ratification.'<br>➢ We received letter on 04-02-2019, reference क्र.का.प्र.वि./आयसीडी/२०१८-१९/५०९, दिनांक १ फेब्रुवारी, २०१९, informing that the Ordinance has been passed by Management Council.<br>➢ We sent a letter Ref.No.WDC/33 of 2019, dt.05-02-2019 to Hon. Vice-Chancellor, copy to The Registrar, requesting to carry the process further to get it passed from the Hon. Chancellor's Office.<br>➢ Now we have received a letter from you about 27-11-2018 Management Council Meeting, with this statement: 'It was resolved that the Ordinance on prevention, prohibition and Redressal of Sexul Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of Women Employees and Student be approved considering corrections and modifications suggested by the Adv. Neel Helekar committee and the same may be sent to Chancellor for his assent.' |
| बाब: १८ | **Approval of MoU between M/s. Tata Consultancy Service Limited and University of Mumbai for the work of electrical installation and furniture work of library building and Rajabai Tower.** |
| ठराव | It was resolved that a draft MoU between M/s. Tata Consultancy Service Limited and University of Mumbai for the work of electrical installation and furniture work of library building and Rajabai Tower be approved and accordingly donation of Rs. 4.20 Cr. from the TCSC limited, be accepted. |
| विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने केलेली कार्यवाही | पत्र क्र. Engg/ICD/2018-19/1219 Dated 21th March, 2019 नुसार An agreement is executed between Ar. Somaya and Kalappa dated 12th February, 2019 and they have preped an estimate which is approved in Building and Works Committee dated 13th March, 2019 |
| बाब: १९ | **Approval of receiving advance amount from MMRDA in lieu of TDR and carrying out necessary works for NAAC Accreditation from MMRDA.** |
| ठराव | It was resolved that permission be granted for receiving an advance amount of Rs. 106.37 Cr. from MMRDA in lieu of TDR generated from land area given to them, balance work, additional work and fees for preparation of master plan of Kalina Campus and also for carring out work of road infrastructure, beautification of campus as per the Development Plan prepared by the University on the recommendations of the committee constituted as per resolution passed in the meeting of M.C. dated 10/09/2018 vide item No. 24 and other allied works necessary for NAAC Accreditation will be done by MMRDA, out of such generated fund. Separate bank account for the same will be maintained by Finance & Accounts Officers. |
| विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने केलेली कार्यवाही | पत्र क्र. Engg/ICD/2018-19/1220 Dated 25th March, 2019 नुसार As per committee's recommendation, Hon'ble Pro-Vic Chancellor has suggested name of works to ne carried out by MMRDA and Engineering Department. A letter is issued to MMRDA vide letter no.UEV/253/106 of 2019 and CDU/323/105 of 2019 dated 21.01.2019. Accrodingly MMRDA and Engineering Department have prepared estimates of the same. |
| बाब: २३ | अंतर्गत लेखा परीक्षक तथा कर सल्लागार यांची नियुक्ती करण्याबाबत. |



36

| | |
|---|---|
| ठराव | बाब क्र. २३ नुसार सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाने अंतर्गत लेखा परीक्षक/कर सल्लागार नियुक्तीसाठी प्रसिद्ध केलेल्या स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सुचनेमध्ये नमुद केलेल्या अटी शर्ती आणि कामाची स्पष्ट केलेल्या व्याप्तीच्या अधीन राहून मे. पी.व्ही. पागे ॲण्ड कंपनी (सनदी लेखापाल) यांची अंतर्गत लेखा परीक्षक/कर सल्लागार पदी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कुलगुरू यांनी श्री. पी. व्ही. पागे, सनदी लेखापाल यांना दयावयाच्या मानधन/शुल्काबाबत त्यांच्याशी वाटाघाटी करून सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा, असे ठरले. |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | मे. पी.व्ही. पागे ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल यांच्याशी वाटाघाटी करुन त्यांना द्यावयाच्या मानधन/शुल्काच्या प्रस्तावासह बाब क्र.९ अन्वये दिनांक २ जानेवारी, २०१९ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास व्यवस्थापन परिषदने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन विद्यापीठाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्रान्वये मे. पी. व्ही. पागे ॲण्ड कंपनी यांची अंतर्गत लेखा परिक्षक तथा कर सल्लागार म्हणून नियुक्ती केली. |
| | **इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने व आयत्या वेळी आलेल्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली व त्या अनुषंगाने खालील प्रमाणे ठराव पारीत झाले :-** |
| | **चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित करण्यात आले.** |
| ठराव | १) पान क्र. २ वर श्रध्दांजली कोणाला द्यावयाची याबाबत झालेली चर्चेमध्ये प्रा. जगताप, श्री. मुकादम, प्रा. नरवडे, श्री. कोळंबेकर यांनी सहभाग घेतला.<br>असा ठराव करण्यात आला की, श्रध्दांजलीमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील निगडीत, ज्यांचा मुंबई विद्यापीठाशी संबंध आहे तसेच राष्ट्रीय स्तरावर ज्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे, प्रसिध्द राजकीय व्यक्ती तसेच प्रशासकीय उच्चपदस्थ विभुषीत जसे; राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, तसेच ज्यांनी भारताच्या राष्ट्र उभारणीसाठी भरीव कामगिरी केलेली आहे. अशांचा समवेश श्रध्दांजलीमध्ये करण्यात यावा.<br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, दिवंगतांच्या कुंटुबांना सात्वंनपर पत्र पाठविण्यात यावे. |
| जनसंपर्क विभाग यांनी केलेली कार्यवाही | पत्र कमांक पीआरओ/आय.सी.डी./२०१८-१९/३ दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी नुसार श्रध्दांजलीमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील निगडीत, ज्यांचा मुंबई विद्यापीठाशी संबंध आहे तसेच राष्ट्रीय स्तरावर ज्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे, प्रसिध्द राजकीय व्यक्ती तसेच प्रशासकीय उच्चपदस्थ विभुषीत जसे; राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, तसेच ज्यांनी भारताच्या राष्ट्र उभारणीसाठी भरीव कामगिरी केलेली आहे. अशांचा समवेश श्रध्दांजलीमध्ये करण्यात येईल असे कळविले आहे. |
| ठराव | २) पान क्र. ४, बाब क्र. १, मुददा क्र. ५ ज्या महाविद्यालयाचे क्रीडा निधी देणे बाकी आहेत त्या महाविद्यालयांची नावासह रक्कमेची |

| | |
|---|---|
| | माहिती देण्यात यावी. वित्त व लेखाधिकारी विभागाने क्रीडा विभागास दिलेले पत्र सादर करावे. क्रीडा अधिकारी ज्या महाविद्यालयात आहे त्या महाविद्यालयांची यादी देण्यात यावी. |
| **वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही** | मे. एम. एस.जाधव ॲण्ड कंपनी यांनी संलग्नता शुल्कांसह विद्यापीठास येणे असलेल्या सर्व शुल्कांबाबत दिलेल्या प्रथम अंतरिम बहवालाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यासाठी विद्यापीठाच्या क्रिडा विभागासह सर्वच विभागांना वित्त व लेखा विभागाचे पत्र क्र. विवले/अंलेप/३४०/२०१८ दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ अन्वये कळविण्यात आले होते. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. तसेच मे. एम. एस. जाधव यांना सर्व शुल्काशी संबंधीत विभागाचे इमेल आयडी कळवून त्या त्या शुल्काच्या वसुलीची प्रगती बंबंधित विभाग प्रमुखांना देणेबाबत निर्देशित केलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.<br>तसेच विद्यापीठाने महाविद्यालयांकडून सर्व शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. एम. के. सी. एल. यांना शुल्काशी संबंधीत सर्व विभागांचे ईमेल आयडी कळविण्यात आलेले आहेत. तसेच सर्व विभागांना वेळोवेळी महाविद्यालयाकडून प्राप्त होणारी त्याच्या विभागाशी संबंधित माहिती एम. के. सी. एल. कडून प्राप्त करुन घेण्याबाबत सुचित केलेले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे. |
| **शा. शि. व क्रिडा विभागाने केलेली कार्यवाही** | पत्र क्रमांक क्रिडा./३१२०/२०१९ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार सन २०१७.१८ या आर्थिक वर्षापासून वार्षीक क्रीडा अंशदान (Annual Sports Contribution) तसचे विद्यापीठातील इतर सर्व शुल्क ऑनलाईन (Online) स्विकारण्यात येत आहे. ह्या संदर्भातील सविस्तर माहितीसाठी वित्त व लेखा विभाग तसेच एम.के.सि.एल. यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. (सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.)<br>या संदर्भातील पत्र वित्त व लेखा विभागाकडून प्राप्त झालेले नाही.<br>१. एलफिस्टन कॉलेज, मुंबई<br>२. बी. एन. एन. कॉलेज, भिवंडी<br>३. के. एम. सी. कॉलेज, खोपोली<br>४. ईस्माईल युसुफ कॉलेज, जोगेश्वरी<br>५. बॅ. बी. के. कॉलेज, वेंगुर्ला<br>या महाविद्यालयात क्रीडा अधिकारी आहेत. |
| **ठराव** | ३) पान क्र. १०, बाब क्र. ६ मधील के.सी. महाविद्यालयाचा दंड कमी करण्याच्या प्रकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली. संपुर्ण दंडांच्या रक्कमेबाबत सविस्तर माहिती (in chronology) सह बाब पुन:श्च सादर करण्यात यावी.<br>के.सी. महाविद्यालयाच्या दंडाबाबत चर्चा करताना असा ठराव करण्यात आला की, ज्या महाविद्यालयांकडून चुका होतात त्यांना दंड आकारला जातो. अशा प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांचा निकल प्रलंबित ठेवण्यात येवू नये व महाविद्यालयाने दंड न भरल्यास महाविद्यालयांवर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी.<br>असाही ठराव करण्यात आला की, महाविद्यालयाला कोणत्या चुकांसाठी किती दंड आकारण्यात यावा याबाबत नियमावली बनविण्यात यावी व सदर नियमावली बनविण्यासाठी समिती गठित करण्यात यावी समिती गठित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात यावा. |
| **परीक्षा व मुल्यमापन** | संपूर्ण दंडाच्या रक्कमेबाबत सविस्तर माहिती (In Chronology) यापूर्वी |

| | |
|---|---|
| विभाग यांनी केलेली कार्यवाही | सादर करण्यात आली होती. मात्र आपल्या पत्रानुसार सदरील माहिती तकत्यानुसार देण्यात यावी असे सुचविण्यात आले. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.<br>के. सी. महाविद्यालयांतील सदर विद्यार्थ्याचा निकाल ठरावानुसार जाहिर करण्यात आला असून महाविद्यालयास तसे कळविण्यात आले आहे. |
| ठराव | ४) यु.सी.सी. विभागांने **Increase of E-charge of Rs. 10/- per student in University share** या बाबीवर आतापर्यंत किती रक्कम जमा झाली. सदर रक्कमेच्या अनुषंगाने काय कार्यक्रम राबविण्यात आले व विद्यार्थ्यांना त्याचा कशाप्रकारे फायदा झाला, रकमेत वाढ करण्याची गरज काय, याची सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| यु.सी.सी. विभागाने केलेली कार्यवाही | केंद्रीय संगणकीय सुविधा विभागाने पत्र क्र. UCC/AR-EA/638/2018 दिनांक ६/१२/२०१८ रोजी कार्यवाही केल्याचे कळविले आहे. |
| ठराव | ५) पान क्र.१३, बाब क्र. १२ पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील सेवाज्येष्ठ शिक्षकांना प्राधिकृत करणेबाबतच्या वेगवेगळया गटांकडून प्राप्त तक्रारींवरील निर्णयावर डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी आक्षेप नोंदवला. |
| शिक्षक व नियुक्ती विभाग (म. शि.) विभागाने केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक टीएएस(सीटी)/आय.सी.डी./२०१८-१९/१२३८ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील सेवाजेष्ठ शिक्षकांना प्राधिकृत करण्यातबाबतच्या वेगवेगळ्या गटांकडून प्राप्त तक्रारीवरील निर्णयावर प्रशासनाने डॉ. वेंकटरमणी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. व्ही. बी. रोकडे व डॉ. कविता लघाटे यांची त्रिसदस्यीय समिती गठीत केली असून सदर समितीच्या पाच बैठका दिनांक ०५/०२/२०१९, १२/०२/२०१९, २५/०२/२०१९, ०५/०३/२०१९ व १४/०३/२०१९ रोजी संपन्न झाल्या असे कळविले आहे. |
| ठराव | ६) प्रदिप सावंत व इतर सदस्यांनी पान क्र. १७ बाब क्र. १ मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने उत्तर पत्रिकेची टेंडर पक्रिया योग्य झाली का? जुन्या उत्तर पत्रिका किती बाकी आहेत? उत्तरपत्रिकेवर नाव टाकण्याच्या निर्णयावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मंजूरी घेतली आहे का? उत्तर पत्रिकेवर नाव टाकण्याचा हेतू काय होता? कारण पूर्वी उत्तरपत्रिकेवर मास्किंग करत होते. उत्तर पत्रिका छपाईसाठी किती खर्च आला? उत्तर पत्रिका किती सेमिस्टरसाठी उपलब्ध आहे? किती उत्तर पत्रिका शिल्लक आहेत? असे अनेक प्रश्न उपस्थित केले व चौकशीची मागणी केली.<br>तसेच श्री. अनिकेत ओव्हाळ, मंत्री कोकण प्रदेश, अ.भा.वि.प यांचे दि. २७/११/२०१८ रोजीचे निवेदनावर व्यवस्थापन परिषदेचे तीन प्रतिनिधीचे शिष्ट मंडळानी भेट देऊन सदरहू दि. २७/११/२०१८ चे निवेदन स्विकारले. तसेच खालील बाबींचा उल्लेख करण्यात आला.<br>प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, निवेदनामध्ये मुंबई विद्यापीठातील परीक्षा विभागातील उत्तर पत्रिका खरेदी प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात यावी, याबाबत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने निवेदन दिले. त्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ |

| | |
|---|---|
| | रोजी मागणी केली आणि आज त्यांनी प्रामुख्याने ४ मागण्या केलेल्या आहेत.<br>१) विद्यापीठाच्या नियमांची पायमल्ली करत विना परवानगी छापण्यात आलेल्या नवीन उत्तर पत्रिका प्रकरणाची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करावी.<br>२) वरील प्रकरणांची चौकशी होईपर्यंत आताच्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे.<br>३) रत्नागिरी येथील फिनोलेक्स महाविद्यालयातील बनावट गुण पत्रिका तयार करणाऱ्या प्रकरणाची विद्यापीठामार्फत चौकशी व्हावी.<br>४) गेल्या १७/३ निकालानंतर केलेल्या पुर्नमुल्याकंन प्रक्रियेदरम्यान झालेल्या जवळपास ३५,००० विद्यापीठाच्या निकालात बदल झाला. तरी तपासणी दरम्यान झालेल्या चुकांची चौकशी करण्यात यावी.<br><br>याबाबत व्यवस्थापन परिषदेत चर्चा झाली. चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, निवेदनाच्या अनुषंगाने मागण्याबाबतची चौकशी करण्यासाठी व मुंबई विद्यापीठातील परीक्षा विभागात उत्तरपत्रिका खरेदी प्रकरणी चौकशी करण्याबाबत व्यवस्थापन परिषदने खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत केली.<br><br>१) श्री. दिपककुमार मुकादम (निमंत्रक)<br>२) ॲड. निल हेळेकर (सदस्य)<br>३) प्रा. वैभव नरवडे (सदस्य)<br>४) श्री. प्रदीप सावंत (सदस्य)<br><br>समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा. |
| **कुलसचिवांचे कार्यालय** | पत्र कमांक आर.ई.जी./आय.सी.डी./२०१८-१९/११०९ दिनांक २२ जानेवारी, २०१९ आणि पत्र कमांक आर.ई.जी./आय.सी.डी. /२०१८-१९/११७८ दिनांक १६ फेब्रुवारी, २०१९ नुसार श्री. दिपककुमार मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती गठीत केली असून चौकशी करुन त्यांचा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. |
| **ठराव** | ७) पान क्र. १९ मधील मुद्दा क्र. ८ बाबत सदस्यांनी असे निर्दशनास आणले की, पाचव्या व सहाव्या सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय/राज्यस्तरीय सांस्कृतिक, एन.एस. एस. आणि एन.सी.सी भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता न आल्यास त्यांची परीक्षा पुनश्च घेण्याचे विद्यापीठाच्या परिपत्रकामध्ये नाही, असे सदस्यांनी स्पष्ट केले.<br>याबाबत डॉ. घाटुळे परीक्षा संचालक परीक्षा मूल्यमापन मंडळ यांनी याबाबत उद्या परीक्षा मूल्यमापन मंडळामध्ये बाब ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले. तद्अनुषंगाने संचालक, परीक्षा मूल्यमापन मंडळ यांनी सदरबाबत निर्णय व त्यावरील कार्यवाही पुढील व्यवस्थापन |



40

| | |
|---|---|
| | परिषदेमध्ये सादर करावी, असे ठरले. |
| परीक्षा व मुल्यमापन विभागाने केलेली कार्यवाही | परिक्षा व मुल्यमापन मंडळ तसेच विद्वत परिषदेपुढे प्रस्ताव ठेवण्यात आले व परिपत्रक काढण्यात आले. |
| ठराव | ८) पान क्र. १८ मधील मुद्दा क्र. ५ प्रा. मॅथ्यू यांच्याबाबत एका महिला शिक्षिकेने महिला विकास कक्षाकडे तक्रार केल्याप्रकरणी महिला विकास कक्षाच्या अध्यक्षांनी प्रा. मथ्यू यांच्याबाबत सहसंचालकांना १५.१२.२०१६ रोजी कोणत्या अधिकरात पत्र पाठविले. तत्कालिक अध्यक्षांचा कार्यकाळ दि. २५.१०.२०१६ रोजी संपला असताना त्यांनी याबाबत पदाचा गैरवापर केला का? या प्रकरणी खालील प्रमाणे चौकशी समिती गठित करण्यात यावी :-<br>१. ॲड. निल हेळेकर (निमंत्रक)<br>२. डॉ. रविकांत सांगुर्डे (सदस्य)<br>३. श्री. राजन कोळंबेकर (सदस्य)<br><br>समितीने त्यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावा.<br>तसेच पुढे असाही ठराव करण्यात आला की, राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशानुसार राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची दखल न घेतल्याने आयोगाने संबंधितांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याने याबाबत विभागीय चौकशी करण्याकरिता डॉ. रश्मी ओझा यांची एक सदस्यीय समिती गठित करण्यात आली. |
| शिक्षक व नियुक्ती विभागाने (म. शि.) केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक टीएएएस(म.शि.)/आय.सी.डी./२०१८-१९/८६० दिनांक २ जानेवारी, २०१९ तसेच पत्र क्रमांक टीएएएस(म.शि.)/आय.सी.डी./२०१८-१९/९३३ दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार एक सदस्यीय समती गठीत करण्यासाठी तारीख व वेळ निश्चित करण्याबाबत डॉ. रश्मी ओझा यांना कळविण्यात आले आहे. |
| ठराव | ९) गृह कर्जाची तरतुद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कोणत्या कलमानुसार करण्यात आली होती व नियमावलीबाबत तसेच या मधल्या काळात कोणा-कोणाला गृहकर्ज देण्यात आली आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती देण्यात यावी, असे दिपककुमार मुकादम यांनी सांगितले. |
| आस्थापना विभाग २ / ४ यांनी केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक ई.एस.टी./आय.सी.डी./२०१८-१९/३४१५ दिनांक २० मार्च, २०१९ नुसार गृहकर्ज योजने अंतर्गत जानेवारी २०१३ ते डिसेंबर २०१८ पर्यंत मंजुर करण्यात आलेल्या कर्मचा-यांची यादी सोबत जोडली आहे. तसेच वित्त व लेखा विभागास या संबधीतची कागदपत्रे पाठविण्या बाबत पत्र केले आहे. |
| ठराव | १०) मेरीट ट्रॅक कंपनीला दिलेल्या पत्राची प्रत २ दिवसात देण्यात येईल असे संचालक, परीक्षा मूल्यमापन मंडळ यांनी सांगितले. |



41

| | |
|---|---|
| परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभागाने केलेली कार्यवाही | पत्र क्र. परीक्षा/के.मु.के./१५६५/२०१८ दिनांक ६/१२/२०१८ नुसार कंपनीला दिलेल्या चेतावणी पत्राची प्रत व त्याबाबत त्यांनी दिलेले उत्तर जोडले आहे. |
| ठराव | ११) प्रा. रत्नपारखी यांना पगार दिला नसल्यास त्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा. |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि. शि.) | पत्र क्र.TAAS(UT)/ICD/2018-19/1192 Dated 21 December, 2018 सोबत जोडले आहे. |
| ठराव | १२) परीक्षा मूल्यमापन मंडळामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी घेण्याबाबत श्री. प्रदीप सावंत यांनी विनंती केली. |
| परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी केलेली कार्यवाही | The appointment of the members on the BOEE is ade as oer the Maharashtra Public University Act, 2016 Section 47 (3) |
| ठराव | १३) विद्यार्थी विकास विभागातर्फे सादर करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त केली व सर्व घटकांचा समावेश असलेली सर्वसमावेशक सल्लागार समितीची स्थापना करावी, अशी मागणी सदस्यांनी केली.<br>सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, विद्यार्थी विंकास विभागामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांबाबत चौकशी करण्याकरिता तसेच विविध प्रकारच्या स्पर्धेकरिता सविस्तर मार्गदर्शन तत्वे निश्चित करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.<br>१) प्राचार्य डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे (निमंत्रक)<br>२) प्राचार्य अजय भामरे (सदस्य)<br>३) श्री. प्रदीप सावंत (सदस्य) |
| विद्यार्थी विकास विभागाने केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक डी.एस.डब्ल्यु.आय.बी./आय.सी.डी./२०१८-१९/६३१ दिनांक २५ मार्च, २०१९ नुसार सांकृतीक कार्यक्रमाबाबत चौकशी करण्याबाबत तसेच विविध प्रकारच्या स्पर्धेकरिता सविस्तर मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याबाबतच्या सदस्यांचा समितीची बैठक आजतागयत झालेली नसल्याने या बाबतच्या कार्यवाही अहवाल सादर करणे शक्य नाही असे कळविले आहे. |
| कुलसचिवांचे कार्यालय | पत्र क्र. REG/ICD/2018-19/1044 Of 2019 नुसार प्राचार्य कुऱ्हाडे, प्राचार्य भामरे व श्री. प्रदिप सावंत यांची सर्वसमावेशक सल्लागार समिती साठी नेमणुक केल्याचे पत्र दिले आहे. |
| ठराव | १४) प्राचार्य भामरे सरांनी सुचविले की, महाराष्ट्र शासनाने जशी सी. एम फेलोजची नियुक्ती केलेली आहे, त्याच धर्तीवर विद्यापीठात व्ही.सी. |



42

| | |
|---|---|
| | फेलोजची सुरूवात करण्यात यावी व फेलो आय.टी., विधी, व्यवस्थापन व इतर अन्य विषयातील विद्यार्थ्यांना देण्यात यावी. सदर प्रस्तावाला प्राचार्य कुऱ्हाडे यांनी अनुमोदन दिले. श्री. मुकादम यांनी ही व्यवस्था व्यवस्थापनाचा तिसरा पदर असेल व सदर व्यवस्था कितपत प्रभावीपणे काम करेल याबाबतची स्पष्टता देण्यात यावी, असे सांगितले.<br><br>सदर फेलो मिळालेली व्यक्ती ही स्वेच्छेने काम करेल परंतु यासाठी विद्यापीठावर कोणताही आर्थिक भार येऊ नये, असे मत श्री. प्रदीप सावंत यांनी व्यक्त केले.<br><br>श्री. प्रदीप सावंत यांनी या संरचनेला विरोध दर्शविला व सदर व्यवस्थेची रचना, कोणत्या विभागात असणार व फेलोजची कर्तव्य व जबाबदारी, अनुभव याची सविस्तर माहिती देण्यात यावी व सदर व्यक्तींना विद्यापीठाचे किती सहकार्य लाभेल त्याचाही विचार करण्यात यावा, असे श्री. सावंत यांनी सांगितले.<br><br>सर्व सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला, सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, सदर फेलोला असणारी शैक्षणिक पात्रता, अनुभव, कामाचे स्वरूप, मानधन त्यांची कर्तव्ये व जबाबदारी तसेच फेलोजची दृष्टी, अभियान, उपयोजन व परिणाम (Vision, Mission, Application and Outcome) काय असेल हे ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे तीन सदस्यीय समिती गठित करण्यात आली :-<br><br>१) प्रा. बि.एन.जगताप (निमंत्रक)<br>२) डॉ. सुभाष वाघमारे (सदस्य)<br>३) ॲड. निल हेळेकर (सदस्य)<br>सदर समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात यावा. |
| **आस्थापना विभाग १ व ३ यांनी केलेली कार्यवाही** | पत्र क्रमांक ई.एस.टी/आय.सी.डी./२०१८-१९/३४२१ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार महाराष्ट्र शासनाने ज्याप्रमाणे सी.एम.फेलोजीची नियुक्ती केलेली आहे, त्याच धर्तीवर विद्यापीठात व्ही.सी. फेलजीची सुरुवात करण्याकरीता व्यवस्थापन परिषेदच्या ठरावानुसार आस्थापना विभाग १ व ३ विभागाने नियुक्त केलेल्या समिती सदस्य श्री. वि. एन. जगताप, डॉ. सुभाष वाघमारे आणि ॲड. निल हेलेकर यांना समितीची बैठक आयोजित करण्याकरीता पत्र क्र.इएसटी/आयसीडी/२०१८-१९/३२०८ दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ नुसार कळविले आहे. |
| **ठराव** | १५) व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या दिवशी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संघटना मोर्चे घेऊन आले होते. संघटनांनी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदस्यांना भेटण्याची विनंती केली असता असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेत कोणत्याही संघटनेला बैठकीत सुनावणीसाठी बोलविण्यात येऊ नये. |
| **कुलसचिवांचे कार्यालय यांनी** | सदर ठरावाची नोंद घेण्यात आली. |

| | |
|---|---|
| केलेली कार्यवाही | |
| ठराव | १६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) (e) नुसार विद्यापीठ सेवेमधील अधिकारी उदा. अधिष्ठाता, विद्यापीठ उपपरिसराचे संचालक, कुलसचिव, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, संचालक, क्रिडा व शारीरिक शिक्षण, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य, संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार यांच्या निवडीकरीता व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेल्या एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांची निवड समितीवर नामनिर्देशित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| आस्थापना विभाग १ व ३ यांनी केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक ई.एस.टी/आय.सी.डी./२०१८-१९/३४२१ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) (C) विद्यापीठ सेवेमधील अधिकारी यांच्या निवडीकरीता व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असलेले एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक म्हणून प्रा. अजय भामरे, रामानंद आर्या डी. ए. व्ही. कॉलेज यांचे निवड समितीवार नामनिर्देशन झालेले आहे असे कळविलेले आहे. |
| ठराव | १७) प्रा. वैभव नरवडे यांनी सांगितले की, प्राचार्यांची प्रभारी मान्यता एक वर्षांसाठी दिलेली आहे. विद्यापीठाने यासंदर्भात पत्रव्यवहार सह-संचालककडे करावा. कारण जे प्रभारी प्राचार्य आहेत, त्यांचा पगार शासनाकडून निघतो. परंतु असे प्रभारी प्राचार्य वर्षानुवर्षे कामकाज करत आहेत; प्रभारी प्राचार्यांच्या पगाराविषयी सह-संचालकानी निर्णय घ्यावा. जे प्राचार्य प्रभारी पदावर आहेत त्या महाविद्यालयाचे कोणतेही दस्तएवज विद्यापीठाने स्वीकारू नयेत; प्राचार्य नेमणुकीचे परिपत्रक विद्यापीठाने काढावे व ज्या ठिकाणी प्रभारी प्राचार्य एक वर्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत आहेत **त्या संदर्भात विद्यापीठाने उच्च शिक्षण सह-संचालक यांना या संदर्भातील शासन निर्णयाचा संदर्भ देऊन पत्र पाठवावे.** |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म. शि.) यांनी केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक टीएएएस(सी.टी)./आय.सी.डी./२०१८-१९/१२३९ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार प्रभारी प्राचार्य यांच्या संदर्भात मा. सहसंचालक उच्च शिक्षण मुंबई विभाग यांना पत्र पाठविल्याचे कळविले आहे. |
| ठराव | १८)अनुदानित/विनाअनुदानित विभागातील शिक्षकांच्या रिक्त जागाबाबत चर्चा करताना सदस्यांनी विनाअनुदानित विभागातील शिक्षकांचे पदे त्वरित भरण्याची प्रकिया सरू करण्यात यावी, अशी मागणी केली. याबाबत मान्य पदे, कारभार, आरक्षण तसेच यू.जी.सी.ने पदे भरण्याबाबत घातलेली बंदी याबाबत सखोल माहिती घेवून पदे |



44

| | |
|---|---|
| | भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असे कुलसचिवांनी सांगितले. |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म. शि.) यांनी केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक टीएएस(सी.टी)./आय.सी.डी./२०१८-१९/१२३७ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार विना अनुदानित विभागातील शिक्षकांची रिक्त पदे त्वरीत भरण्याची प्रक्रिया लोकसभा निवडणूक २०१९ ची आदर्श आचारसंहिता सुरु असल्याने पदभरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही असे कळविले आहे. |
| **ठराव** | १९) विद्यापीठातील तात्पुरत्या कर्मचाऱ्यांच्या गंभीर प्रश्नाबद्दल चर्चा करताना सदस्य म्हणाले की, अनेक कर्मचाऱ्यांनी न्यायालयात केसेस दाखल केलेल्या आहेत. सदस्यांनी या प्रकरणी नेमक्या कोणत्या विभागात किती तात्पुरत्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे, याचा अभ्यास करून याबाबत सविस्तर आढावा घेऊन विद्यापीठात किती पदे निर्माण करावी व किती करार पध्दतीने भरावी, याचा निर्णय घेण्यात यावा व याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी केली.<br><br>सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, तात्पुरत्या कर्मचाऱ्यांची विभागनिहाय किती आवश्यकता आहे, त्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी ७ सदस्यांची समिती कुलसचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात यावी. सदर समितीने विद्यापीठातील विभागनिहाय कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या कामाचे लेखापरिक्षण (Work Audit) करून आकृतीबंध तयार करावा. समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| आस्थापना विभाग १ व ३ यांनी केलेली कार्यवाही | पत्र क्रमांक ई.एस.टी/आय.सी.डी./२०१८-१९/३४२१ दिनांक २२ मार्च, २०१९ नुसार विद्यापीठातील तात्पुरत्या कर्मचा-यांची नेमकी कोणत्या विभागात किती आवश्यकता आहे, त्याच सखोल अभ्यास करण्यासाठी ७ सदस्यांची समिती गठित करणे करीता उपकुलसचिव, आस्थापना विभाग १ व ३ यांनी ७ सदस्यांचे नामनिर्देशन करणे करीता मा. कुलगुरु यांना आस्थापना विभाग १ व ३ यांनी क्र.इएसटी/आयसीडी/२०१८-१९/३२६६ दिनांक ६ मार्च, २०१९ नुसार टिप्पणी सादर केलेली आहे असे कळविले आहे. |
| **ठराव** | २०) आयकर विभागामार्फत विद्यापीठात आयकर भरण्याबाबत प्राप्त झालेली नोटीसीबाबत श्री. दिपककुमार मुकादम यांनी सध्याचे सनदी लेखापाल श्री. ए. व्ही. आरोळकर या विषयातील तज्ज्ञ नसल्याने व त्यांच्या कडून योग्य ती तज्ज्ञ सेवा मिळत नसल्याने त्यांना बदलण्यात यावे व तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी केली. याबाबत लवकरात-लवकर निर्णय घेण्यात येईल असे कुलगुरूंनी सांगितले. |
| **वित्त व लेखा विभाग यांनी केलेली कार्यवाही** | विद्यापीठासाठी आयकर सल्लागार म्हणून मे. पी. व्ही. पागे ॲण्ड कंपनी या कंपनीची व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २ जानेवारी, २०१९ च्या बैठकीत नियुक्ती करण्यात आलेली आहे.<br>श्री. ए. व्ही. आरोळकर यांची विद्यापीठाचे सल्लागार म्हणून नियुक्ती नसून, आयकर विभागाने सन २००६-०७ ते २०११-१२ या वित्तिय वर्षासाठी बजावलेल्या रु.४७.५९ कोटी च्या आयकर नोटीसीपुरतीच उत्तरे देण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. |
| **ठराव** | २१) विद्यापीठाच्या बहृत आराखडयाबाबत चर्चा करताना विद्यापीठ बहृत आराखडयाप्रमाणे काम करते का नाही हे तपासले पाहिजे व ५ वर्षात |

| | |
|---|---|
| | विद्यापीठाने काय प्राप्त करणे, विद्यापीठाचा स्तर निरंतर उंच जाण्यासाठी बहृत आराखडयानुसार अंमजबजावणी करणे गरजेचे आहे. राज्यसरकारने ज्या कार्यकक्षा दिल्या आहेत, त्याप्रमाणे काम करून सर्व वंचिताना जसे; दिव्यांग, आदिवासी, दुर्गम व डोंगराळ प्रदेश, मागासलेले या सर्वांना बहृत आराखडयानुसार फायदा होईल, असे बघितले पाहिजे. तसेच बहृत आराखडयानुसार पुर्न:अवलोकन करून घेणे गरजेचे आहे. सर्व जिल्हानिहाय प्रतिनिधी देण्यात यावे व समिती गठित करण्यात यावी. बहृत आराखडयानुसार विविध हेतूनुसार प्रत्येक हेतूसाठी एक एक तज्ज्ञ नेमावा, अशी मागणी सदस्यांनी केली असता प्रा. बि.एन. जगताप व प्र-कुलगुरू यांची **भविष्यातील योजना** बनविण्यासाठी, एक समिती गठित करण्यात यावी. सदर समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांशिवाय काही प्राचार्य व **विविध** विषयातील तज्ज्ञ **हिततुल्य घटकांचा (Stake holders)** समावेश करण्यात यावा, जेणेकरून सदर सदस्य त्यांच्या सूचना देतील. तसेच विद्यापीठाच्या बहृत आराखडयानुसार विद्यापीठ सुस्थितीत चालले आहे की नाही यावर देखरेख ठेवता येईल व व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत याबाबत वेळो-वेळी अहवाल सादर करण्यात यावा. |
| **संलग्नता व मान्यता विभाग यांनी केलेली कार्यवाही** | पत्र कमांक सलंग्नता/आय.सी.डी./२०१८-१९/२१८१ दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार बृहत आराखड्यानुसार विविध हेतूनुसार प्रत्येक हेतूसाठी एक एक तज्ज्ञ नेमण्याबाबत मा. कुलगुरुंना नस्ती सादर करण्यात आलेली आहे. |
| **ठराव** | २२) आयडॉलच्या संचालकांनी वाहन कधी घेतली व वाहनाची सी.एन.जी, पेट्रोल किंवा दोन्ही, भरलेली बिले याची माहिती देण्यात यावी. विद्यापीठाच्या किती वाहने, वाहनाचा प्रकार, कोणते अधिकारी वाहन वापरतात, याची माहिती देण्यात यावी. व्यवस्थापन परिषदेतील सदस्यांनी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी वाहनांसाठी सी.एन.जी.चा वापर करावा, अशी मागणी केली. कुलसचिवांनी सांगितले की, सर्व वाहनांमध्ये सी.एन.जी.चा वापर करावा अशा आदेशाचे परिपत्रक काढून निर्गमित करण्यात येईल. |
| **दूर व मुक्त अध्ययन संस्था यांनी केलेली कार्यवाही** | |
| **सामान्य प्रशासन विभाग फोर्ट यांनी केलेली कार्यवाही** | |
| **ठराव** | २३) विद्यापीठाच्या प्रत्येक व्यवस्थापन परिषदेची बैठकीत, प्रत्येक विद्या शाखेच्या अधिष्ठात्यांनी गेल्या दोन वर्षांमध्ये आपल्या विद्यापीठात काही गुणात्मक सुधारणा झाली का? याबाबत त्यांनी त्यांचे १० मापदंड ठरवून घ्यावे व पुढील दोन वर्षासाठी विद्यापीठाची वाटचाल कशी असावी, याबाबत अहवाल देण्यात यावा. अशी सूचना सदस्यांनी केली असता कुलगुरूंनी सांगितले की, हा एक खुपच छान उपकम आहे. |



46

| | |
|---|---|
| | विद्यापीठाचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी काय-काय करायची गरज आहे, त्यात काय उणिवा आहेत, बाहेरच्या जगाला काय अपेक्षित आहे? आंतरराष्ट्रीय स्तरावर काय प्रक्रिया आहेत यासाठी संरचनात्मक कार्यक्रम करावयाचा आहे. प्रत्येक विद्या शाखेतील अधिष्ठात्याने त्यांच्या अखत्यारित असलेल्या विद्या शाखेमध्ये काय प्रश्न आहेत, काय उणिवा आहेत, त्या कशा दुर करण्यात येतील, सध्याची परिस्थिती काय आहे, पुढच्या १० वर्षात आंतरराष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक स्तरावर काय बदल अपेक्षित आहे, विद्यापीठाच्या डिजिटल क्षेत्रातील भविष्यातील आव्हाने यासाठी स्लाईडस बनवून सादरीकरण देण्यात यावे.<br><br>प्र-कुलगुरूंनी विद्यापीठाची पुढील ५ वर्षातील वाटचाल यावर सादरीकरण करतील.<br>डॉ.बि.एन. जगताप सर, विद्यापीठाला सर्वांगीण विकास व उपाययोजना याबद्दल सादरीकरण करतील. |
| **कार्यवाही** | **डॉ. बी. एन. जगताप यांनी या बाबत थोडक्यात सादरीकरण केले आहे.** |
| **ठराव** | २४) बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदलीचे पत्र कोणी व कसे दिले, असा मुद्दा सदस्यांनी उपस्थित केला. बिर्ला महाविद्यालयाला "No Dues certificate" न तपासता नाव बदलण्याची परवानगी देण्यात आली, असे सदस्यांनी निदर्शनास आणले. याबाबत उप कुलसचिव संलग्नता विभाग यांच्याकडून सविस्तर खुलासा मागविण्यात यावा, असे ठरले. |
| **कुलसचिवांचे कार्यालय यांनी केलेली कार्यवाही** | उपरोक्त ठरावानुसार श्री. दिपक वसावे, उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांचेकडून खुलासा मागविण्यात आला. प्राप्त खुलासा व्यवस्थापन परिषदेच्या अवलोकनार्थ सोबत जोडला आहे. |
| **ठराव** | २५) मेसर्स जाधव आणि कंपनी यांना संलग्न महाविद्यालयाकडून किती शुल्क येणे आहे यासाठी विद्यापीठ प्रशासनाने कशा प्रकारे दंडाची रक्कम वसुली करण्याकरिता पत्र पाठविली, त्या महाविद्यालयाची यादी देण्यात यावी व पत्राचा नमुनाही देण्यात यावा. याबाबतची सविस्तर माहिती व कागदपत्र व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी, अशी मागणी सदस्यांनी केली असता ती मान्य करण्यात आली तसेच ज्या महाविद्यालयांचे 'देय रक्कम' बाकी आहे त्या महाविद्यालयांना पत्र पाठवितांना जाधव समितीच्या अहवालानुसार देयाची कागदपत्र जोडण्यात यावीत व सर्व महाविद्यालयांना पुनश्च पत्र पाठवावे, अशी मागणी श्री. दिपककुमार मुकादम यांनी केली, असता ती मान्य झाली.<br>मेसर्स जाधव आणि कंपनी तर्फे करण्यात येणाऱ्या ऑडिटवर काही महाविद्यालयांचे आक्षेप/तक्रारी असल्यास तसेच जी महाविद्यालये अंशत: रक्कम अदा करतील त्यांच्या उर्वरित रक्कम अदा करण्याबाबत समिती गठित करण्यात यावी. समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br>महाविद्यालयाकडून येणारे पैसे जमा करण्याकरिता एक बॅंकेचे खाते (आर.टी.जी.एस) करण्याकरिता उघडण्यात यावे. जी महाविद्यालयाचे पैसे भरतील त्यांचे पैसे स्विकारण्यात यावे.<br>कुलसचिव व वित्त व लेखाधिकारी यांनी याबाबत लक्ष घालून उचित कार्यवाही करावी व व्यवस्थापन परिषदेत अहवाल सादर करण्यात यावा, असे ठरले. |



A7

| | |
|---|---|
| **वित्त व लेखा विभाग यांनी केलेली कार्यवाही** | पत्र क्रमांक एफएओ/आय.सी.डी./२०१८-१९/१ दिनांक २४ डिसेंबर, २०१८ नुसार प्रलंबित शुल्काबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय अशसकीय, अनुदानित विनाअनुदानित महाविद्यालयांना परिपत्रक पाठविले आहे. |
| **सलंग्नता व मान्यता विभाग यांनी केलेली कार्यवाही** | पत्र क्रमांक सलंग्नता/आय.सी.डी./२०१८-१९/२१८१ दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार मेसर्स जाधव आणि कंपनी यांना संलग्न महाविद्यायलयाकडून किती शुल्क येणे आहे यासाठी विद्यापीठ प्रशासनाने कशाप्रकारे दंडाची रक्कम वसुली करण्याकरिता पत्र पाठविली त्या महाविद्यालयाची यादी व पत्राचा नमुना सोबत जोडला आहे असे कळविले आहे. |

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)



48